# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५८** **दिनांक १२/०६/२०२१**

**गावठी बनावटीचे २ माउजर पिस्टल, २ मॅगझीन, ४ जीवंत काडतुस विनापरवाणा बाळगणा-या दोन आरोपीतांना अटक - मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई**

दिनांक ११/०६/२०२१ रोजी रात्रौ २०:४० चे सुमारास नयानगर पोलीस ठाणेचे हददीत राधाकृष्ण हॉलच्या समोरील बाजुस, मिरारोड रेल्वे स्टेशन ते सृष्टीकडे जाणाऱ्या रोडवर दोन इसम अग्निशस्त्र विक्री करण्याकरीता येणार असल्याची गोपनीय माहीती मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वपोनि/जितेंद्र वनकोटी यांना मिळाली होती.

नमुद बातमीचे अनुषंगाने मा. वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाखाली कारवाई करणे करीता पथक तयार करुन राधाकृष्ण हॉलच्या समोरील बाजुस मिरारोड रेल्वे स्टेशन ते सृष्टीकडे जाणाऱ्या रोडवर मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथकाने सापळा रचला असता बातमीदाराने सांगितल्याप्रमाणे दोन इसम पायी चालत येताना दिसले. सदर दोन्ही इसमांना ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ते विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) मुकेश कन्हैयालाल माली, वय ३० वर्षे, रा. जि.मनसोर राज्य- मध्यप्रदेश २) बंटी कैलासजी सुर्यवंशी, वय २० वर्षे, रा. जि.मनसोर, राज्य-मध्यप्रदेश असे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडुन गावठी बनावटीचे २ माउजर पिस्टल, २ मॅगझीन, ४ जीवंत काडतुस असे एकुण ७२,५००/- रुपये किंमतीची अग्निशस्त्रे हस्तगत करण्यात आली आहेत. सदर इसमांविरुध्द नयानगर पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं ३४५/२०२१ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह महाराष्ट्र कायदा कलम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, पुढील कारवाई कामी सदर दोन्ही आरोपीतांना नयानगर पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वपोनि/जितेंद्र वनकोटी, सपोनि/प्रविण स्वामी, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/अमोल आंबवणे, सपोनि/नितीन बेंद्रे, पोहवा/१४९३ जर्नादन मते, पोना/१६१० शिवाजी पाटील, पोना/१०३१ राजाराम काळे, पो.अं./३३७५ राजेश श्रीवास्तव, पो.अं./३५०२ सतीश जगताप, पो.अं./१८६७ महेश वेल्हे, पो.अं./२३७४ गजानन चव्हाण या पथकाने केली आहे.

-------ooooo-------